भाई माधवराव बागल एक राजकीय अभ्यास

## प्रकरण - पहिले

## ऐतिहासिक पार्श्वभूमी

# प्रकरण पहिले

## ऐतिहासिक पार्श्वभूमी

कोल्हापूर हे करवीर संस्थान म्हणून ओळखले जाते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर संभाजी महाराजांचा औरंगजेबाच्या कैदेत वध झाला. यामुळे छत्रपतींच्या गादीवर राजाराम महाराज आरूढ झाले. सन १७०० साली राजाराम महाराजांचे निधन झाले. त्यानंतर राजारामांच्या पत्नी ताराराणीने आपल्या शिवाजी नांवाच्या राजपुत्रास गादीवर बसवून पन्हाळ गडावरून राज्यकारभार चालविण्यास सुरुवात केली. दरम्यानच्या काळात संभाजीचे चिरंजीव शाहु औरंगजेबाच्या कैदेतून मुक्त झाल्यानंतर त्यांनी ताराराणीकडे राज्याची मागणी केली पण ताराराणीने राज्य देण्यास नकार दिल्यानंतर पुढे ताराराणीचा पराभव करून शाहु महाराजाने अजिंक्य तारा किल्ला ताब्यात घेवून १७०८ मध्ये साताऱ्यात स्वत:चा राज्याभिषेक करून घेवून स्वतंत्र राज्यकारभार सुरू केला.[१]

साताऱ्याचे राज्य निर्माण झाल्यानंतरही सातारा व कोल्हापूर (करवीर) असे दोन छत्रपतींचे राज्य परस्परात १७३० चा तह होईपर्यन्त सातत्याने भांडत होते.

करवीर संस्थानात ताराबाईने रामचंद्र आमात्य यांच्या मदतीने आपले वेगळे राज्य स्थापन केले पण ताराबाईच्या सवतीने राजसबाईने रामचंद्र आमात्यांच्याच मसलतीने आपला पुत्र संभाजी यास करवीरच्या गादीवर बसवून ताराबाई व त्यांची सून भवानीबाईस नजरकैदेत ठेवले.

.....

ताराबाईंच्या निधानानंतर करवीर संस्थानात कागलच्या घाटगे घराण्यातील शाहू महाराज १८८४ मध्ये दत्तक येईपर्यन्त फारसे प्रभावी राजे या संस्थानात झाले नाहीत. मध्यंतरी पेशव्यांनी करवीर संस्थान साताराच्या छत्रपतींच्या अधिपत्याखाली आणण्याचा प्रयत्न केला पण ते या कामगीरीत असफल ठरले.[२]

शाहु महाराज कोल्हापूरच्या गादीवर येण्यापूर्वी म्हणजे १८१५ ते १८८४ या ७० वर्षांच्या कालखंडात संस्थानात मोठी बेबंदशाही होती. या काळातील पांचही छत्रपती दुर्बल ठरल्यामुळे कोल्हापूरच्या प्रजेस नोकरशाहीच्या हातात, दिवाणशाही, रिजंट शाही व कौन्सिल शाही यांच्या बेबंदशाहीत दिवस कंठावे लागत होते. पुरोहित जहागिरदार यांच्यांत ब्राह्मणांचेच वर्चस्व होते. यामुळे या संस्थानात बेबंदशाहीचे वातावरण निर्माण झालेले होते. यामुळे शाहु महाराजांच्या हाती सत्ता आल्यानंतर प्रारंभीच्या काळात या सर्वांचा थोडासा त्रास जाणवत होता.

१८८२ साली आबासाहेब घाटगे यांची कोल्हापूरचे रिजंट म्हणून नेमणूक झाली. १८८३ साली नगरच्या किल्ल्यात चौथे शिवाजी यांचा अंत झाला. त्यानंतर त्यांच्या पत्नी आनंदीबाईंनी घाटगे घराण्यातील यशवंतराव फ उर्फ शाहु महाराज यांना करवीर संस्थानच्या गादीवर दत्तक घेतले. १७ मार्च १८८४ साली शाहु छत्रपतींचा राज्यारोहण समारंभ पार पडून त्यांनी संस्थानचा कारभार हाती घेतला.[३]

कोल्हापूर संस्थानांत नऊ मांडलीक होते. त्यात विशाळगड, बावडा, कागल, कापशी, तोरगल, इचलकरंजी, कागल (हिम्मत बहादूर व सरलष्कर यांचा समावेश होता. संस्थानचे कार्यक्षेत्र ३२१७ चौरस मैल असून लोकसंख्या साधारणपणे ९ लाख इतकी होती. संस्थानातील महसुल उत्पन्न ५३ लक्ष रुपयापेक्षा प्रतिवर्षाला जास्त मिळत होते.[४]

......

## शाहू महाराजांची क्रांतीकारी राजवट :

कागलच्या आबासाहेब घाटगे यांचे चिरंजीव यशवंतराव उर्फ छत्रपती शाहू महाराज कोल्हापूरच्या गादीवर आल्यानंतर ख-या अर्थाने संस्थानातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक,सांस्कृतिक, धार्मिक परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल सुरु झाली. शाहु महाराजांचा कालखंड महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा टप्पा म्हणूनच ओळखाला जातो.

राजर्षी शाहू महाराज कोल्हापूरचे राज्यपद स्विकारल्यानंतर वेदोक्त प्रकरणामुळे संस्थानातील सर्वच स्थितीला कलाटणी मिळत गेली. महाराजांच्या स्नान प्रसंगी वेदोक्त मंत्र म्हणण्याऐवजी पुराणोक्त मंत्र म्हणणा-या नारायण भटास जाब विचारला असता त्यांनी शुद्रासाठी पुराणोक्त मंत्राच म्हणावे लागतात असे उत्तर दिल्यामुळे शाहू महाराजांचा या प्रसंगामुळे स्वाभिमान दुखावला गेला. यातून वेदोक्त प्रकरण गाजत गेले.

या काळातील टिळक, विजापूरकर या पत्रकारांनी ब्राहमणांची बाजू उचलून धरली. राजवाडयातील सर्व धार्मिक विधी वेदोक्त पध्दतीनेच केला पाहिजे अन्यथा दक्षिणा मिळणार नाही असा महाराजांनी हुकूम काढला. यावर राजोपाध्ये यांनी शंकराचार्यांच्या वा काशीच्या पंडितांच्या अनुज्ञेशिवाय बंद पडलेली पध्दत सुरु करता येणार नाही असे उत्तर दिले. राजोपाध्यांना वार्षिक सुमारे ३०,०००/- रुपये उत्पन्न मिळत होते. उत्पन्न बंद केल्यानंतर राजोपाध्ये म्हणाले की, कोल्हापूर गादीचे छत्रपती जरी क्षत्रीय असले तरी शाहू महाराज हे कागलच्या घाटगे घराण्यात जन्मले असल्याने त्यांची विनंती मान्य करता येणार नाही. उत्पन्न जप्त झाले तरी बेहत्तर पण वेदोक्त कर्मे करणार नाही. यानंतर विजापूरकर व इचलकरंजीकर यांच्या पाठींब्याने हायकोर्टात धाव घेतली तिथेही त्यांच्या विरूध्द निकाल लागला. शेवटी देवाच्या शापाच्या भितीचे अस्त्र उपसले.

......

या प्रकरणात लोकमान्य टिळकांनी केसरी वृत्तपत्रातून शाहू महाराजांच्या निर्णयाविरुध्द लिखान केले. त्यांनी आपल्या लेखात म्हटले होते की, " अलीकडे इंग्रजी विद्येने व पाश्चात्य शिक्षणाने सुसंस्कृत झालेल्या मराठयांच्या मनात जी काही 'खुळे' शिरली आहेत त्यापैकीच वदोक्त कर्माचे खुळ एक होय.बरेच दिवसापूर्वी हे बंड प्रथमत: गायकवाड सरकारच्या प्रोत्साहनाने बडोद्यात सुरु झाले व त्याचा संसर्ग आता कोल्हापूरा-पर्यन्त जाऊन भिडला आहे व इतर ठिकाणीही तोच प्रकार होण्याचा संभव आहे. वैदिक मंत्रांनी संस्कार झाले म्हणजे मराठे व ब्राहमण एका जातीचे होतील असे अशी कोणाची कल्पना असेल तर ती निर्मूल आहे. मराठयांचे आपले क्षात्र तेज व्यक्त करण्याचा मार्ग वेदोक्त मंत्राने श्रावणी करणे हा नव्हे. मराठयांच्या घरच्या क्रिया वेदोक्त झाल्याने त्यांना विशेष महती प्राप्त होईल असे म्हणणे चुकीचे आहे. यात काही भूषण नाही, बहुमान नाही व देशकार्यही नाही. हा वेदपठणाचा प्रश्न नाही, वेदोक्त संस्कार करण्याचा प्रश्न आहे. व्यक्ती स्वातंत्र्याचेच मत घेतले तर कोणाही ब्राहमणास अशाप्रकारे मराठयांचे वेदोक्त संस्कार करण्यास लावणे किंवा जो नाकारील त्याची जहागीर, वतन वा वेतन जप्त करणे हे अयोग्य नव्हे तर अन्यायाचे होईल. मराठेशाहीत व ब्राहमणी राज्यात जर असे प्रकार घडले तर राजा व प्रजा यांच्यात व जातीजातीत तटे माजून अखेरीस दंगेधोपे होण्यापर्यन्त मजल आली असती. "

वेदोक्त प्रकरणाचा समारोप करताना सयाजीराव गायकवाडांचे चरित्राकार दाजी आपटे म्हणतात की, शिवाजी महाराजांच्या काळी हा निर्णय लागल्यानंतर त्यांच्या वंशजांना व नातलगांना वेदोक्ताधिकार ओघानेच आले. छत्रपतींचे क्षत्रियत्व मानल्यावर कोल्हापूर, बडोदे,संस्थानिकांनी वेदोक्ताधिकार घेतले तर त्यांच्या कृत्याला टिळकासारख्यांनी " खुळ " म्हणणे हे अगदी तर्क दुष्ट आहे.

......

वेदोक्त प्रकरणातील शेवटची लढाई शाहू महाराज व संकेश्वरचे शंकराचार्य यांच्यात रंगली. ब्रम्हणाळकर स्वामींच्या नेमणूकीवेळी शाहू महाराजांची परवानगी न घेताच नियुक्ती करण्यात आली. यातून प्रकरण खूपच रंगत गेले.

जन्मजात पुरोहितशाही विरुध्द बंड पुकारुन त्यांचा अंत करण्यासाठी महाराजांनी कोल्हापूरात १९२० साली " शिवाजी क्षात्रिय वैदिक पाठशाळा" स्थापन केली. राजवाडयातील सर्व धार्मिक विधी या पाठशाळेतील इतर जातीतील विद्यार्थी करु लागले. राज्यात त्यांच्या हस्ते वैदिक पध्दतीने विवाहसुध्दा होवू लागले होते. पाटगांव येथील मौनी मठावर श्री. सदाशिवराव पाटील यांची १९२१ साली महाराजांनी " क्षात्र जगतगुरु " म्हणून स्थापना केली. या पीठाचे संस्थापक मौनी महाराज नांवाचे ब्राहमणेतर साधु होते. जाती निरपेक्ष बुध्दीने पुरोहित तयार करण्याची चळवळ सुरु करुन महाराजांनी धार्मिक क्षेत्रातील ब्राहमण पुरोहितशाहीचे वर्चस्व नष्ट केले आणि ब्राहमण पुरोहितांच्या मानसिक गुलामगिरीतून ब्राहमणेत्तरांना मुक्त केले.

शाहु महाराजांच्या समकालीन काळातच महात्मा जोतीराव फुल्यांची सत्यशोधक चळवळ वाढत होती. फुल्यांच्या चळवळीमुळे महाराष्ट्रातील ब्राहमणेतर चळवळीने कोल्हापूर संस्थानांत फारच मोठया वेगाने मूळ धरले. शाहु महाराजांनी या चळवळीत स्वत: कार्यकर्ता म्हणून कार्य केलेले नसलेतरीही या चळवळीला लागणारी मदत व त्यांच्या कार्यक्रमाला सातत्याने प्रोत्साहन देण्याचे कार्य केले. यामुळे संस्थानातील ब्राहमणेतर कार्यकर्त्यांची फळी सातत्याने कार्यरत राहिली.[५]

संस्थानातील जनतेच्या सर्वांगिण विकासासाठी शाहू महाराजांनी सातत्याने कार्य केले. या संस्थानात शिक्षणाचा व्यापक प्रसार व्हावा

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

यासाठी शाळा व वसतीगृह काढण्यास त्यांनी असंख्य संस्थाना प्रोत्साहान दिले. दलित व उपेक्षित समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची खास व्यवस्था करण्याकडे शाहु महाराजांनी लक्ष दिले. शाहु महाराजांच्या प्रेरणेनेच सातारा येथे कर्मवीर भाऊराव पाटील यांनी बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी रयत शिक्षण संस्थेची मुहुर्तमेढ रोवली. त्या संस्थेचा वटवृक्ष आज मोठया प्रमाणावर दिसतो.

शैक्षणिक कार्या इतपतच महाराजांनी केलेले सामाजिक क्रांतीचे कार्य महत्वाचे आहे. अस्पृश्यता ही अमानुष गुलामगिरी असून ती समाजातील एक कलंक आहे. चातुर्वण्यांची चौकट मोडल्याशिवाय सामाजिक सुधारणा घडवून आणता येणार नाहीत त्यासाठी अस्पृश्यांना जवळ करण्याचे धोरण शाहु महाराजांनी अंगिकारले.

शाहु महाराजांनी दलित समाजातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या व सवलती देण्याचे कार्य हाती घेतले. स्त्री शिक्षणाचा पुरस्कार शाहू महाराजांनी मोठया जोमाने केला. शिक्षण वरिष्ठ समाजाकडून कनिष्ठ समाजाकडे झिरपत जाईल या सिध्दांताला महात्मा फुले प्रमाणे शाहु महाराजांनी विरोध केला. मूठभरांची मक्तेदारी त्यांनी नष्ट करुन शिक्षणाचे मुक्तद्वार सर्वांसाठी खुले केले.

शाळा, तलाव, रुग्णालये, कचेऱ्या, राजवाडा, राजाची पंगत ही दलितानां खुली केली. त्यांची अवहेलना बंद करुन त्यांना माणूसकीचे हक्क मिळवून दिले. या समाजातील लोकांना सन्मानाने जगता यावे म्हणून नोकऱ्या देण्यात पुढाकार घेतला, उद्योग धंद्यासाठी प्रोत्साहन दिले. अस्पृश्यता नष्ट व्हावी यासाठी शाहु महाराजांनी दोन वटहुकूम काढले. १९१८ मध्ये छत्रपतींनी महारांची बलुते पध्दत बंद करुन त्यांच्या जमिनी त्यांच्या नांवावर रयतवारीने करुन दिल्या व त्यांची महार वतनातून मुक्तता केली. कुलकर्णी वतने नष्ट करुन

.....

अस्पृश्य तरुणांना त्यांनी तलाठी म्हणून नियुक्त केले. नोकऱ्यांत ५० टक्के जागा दलितासाठी राखीव ठेवून क्रांतीकारक कार्यक्रम हाती घेतला.

करवीर संस्थानातील आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक परिवर्तनाच्या कार्यात शाहू महाराजांचा वाटा प्रमुख आहे. या संस्थानातील जनतेला ही राजवट आपुलकी निर्माण करणारी होती. इतर संस्थानातील जनतेपेक्षा निराळा अनुभव या राज्यात मिळाला.[६]

छत्रपती शाहू महाराजांचे ६ मे १९२२ रोजी निधन झाल्या-नंतर संस्थानच्या गादीवर शाहू महाराजांचे जेष्ठ चिरंजीव राजाराम महाराज यांची नियुक्ती झाली.

राजाराम महाराज सत्तेत आल्यानंतर शाहू महाराजांच्या कार्यात भर घालण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पण जनतेच्या राजकीय हक्काबाबत उदासीन राहिले. राजाराम महाराजांच्या काळातच गांधींच्या नेतृत्वाखाली देशभरात स्वातंत्र्य आंदोलनाची चळवळ जोमाने वाढत होती. संस्थानात देखिल या चळवळीचे वारे पसरलेले होते. कॉंग्रेसचा प्रत्यक्ष संस्थानात हस्तक्षेप नसला तरी त्या विचारांने प्रभावीत झालेले कार्यकर्ते स्वातंत्र्य चळवळीचे कार्य करीत होते.[७]

राष्ट्रीय स्तरावर स्थापन झालेल्या संस्थानात असलेल्या जनतेच्या प्रतिनिधींची संघटना स्थापन होवून अ. भा. संस्थानिक सभा या नांवाने कार्य सुरु होते. त्यामुळे स्वातंत्र्य चळवळीचे वारे संस्थानात पोहोचले होते.

संस्थानात याच काळात जबाबदार शासन पध्दतीने अंमलात आणावी, मुद्रण व भाषण स्वातंत्र्य मिळावे यासारख्या मागण्यापुढे घेवून " प्रजा परिषद" या संघटनेची स्थापना करण्यांत आली. संघटना व संस्थान यांच्यातील संघर्षाला याच दरम्यान सुरुवात झाली. या चळवळीचे नेतृत्व माधवराव बागल, रत्नाप्पा

.....

कुंभार या प्रमुख नेत्यांनी केले. भाई बागल यांचे नेतृत्व या चळवळीतूनच पुढे आलेले दिसते.

बागलांचा उदय :
============

माधवराव बागलांचा जन्म २८ मे १८९६ रोजी कोल्हापूरात झाला. माधवरावांचे वडील खंडेराव बागल हे कोल्हापूर संस्थानातील पहिले वकील होते. हातकणंगले येथे खंडेराव बागल मामलेदार म्हणून कार्य करीत होते.

माधवराव बागल यांना शंकरराव, वसंतराव व दिनकरराव हे तीन बंधु होते. यातील वसंतराव बागल पुढे संस्थानातील मुख्यमंत्री बनले.

माधवराव बागल यांचे शिक्षण हातकणंगले, कोल्हापूर व मुंबई येथील जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्, पेंटिंग, शिल्पकला येथे झाले. माधवराव प्रारंभीच्या काळात एक कलाकार म्हणूनच पुढे येतील असे वाटत होते.

खंडेराव बागल हे सत्यशोधक चळवळीच्या विचाराकडे आकर्षित झालेले होते. यामुळे मुंबई इलाख्यातील या चळवळीतील नेत्यांचा त्यांच्याशी सातत्याने संपर्क आलेला होता. शाहू महाराजांच्या संस्थानात नोकरीत असताना देखील महाराजांनी स्थापन केलेल्या " क्षात्र जगतगुरू " पीठास भास्करराव जाधव यांच्यासोबत खंडेराव बागलांनी विरोध केला.

सत्यशोधक चळवळीच्या विचाराचे वातावरण बागलांच्या घरात असल्यामुळे या विचाराकडे माधवराव आकर्षित होवू लागले. जे. जे. स्कूलचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी त्यांना शाहू महाराजांनी आर्थिक मदत केलेली होती. महाराजांच्या सामाजिक चळवळीचा प्रभावही बागलावर मोठया

......

प्रमाणावर झालेला दिसतो. शाहू महाराजांच्या सामाजिक परिवर्तनाच्या कार्यातून बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार याच काळात वाढत चाललेला होता. यामुळे माधवरा समवेत नवी पिढी जागृत होत चालली होती.

माधवराव बागल जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्सचे शिक्षण पूर्ण करून अ कोल्हापूरात परतल्यानंतर बागल कांही काळच चित्रकलेच्या व्यवसायात रमले.

खंडेराव बागलांनी सुरू केलेल्या " हंटर " वृत्तपत्राचे काम माधवराव करू लागल्यानंतर सामाजिक, राजकीय, आर्थिक विषयांवर अभ्यास व लिखान करण्यास सुरूवात झाली. "हंटर" पत्रातील लिखानाबाबत संस्थानात त्यांना शिक्षा होवून संस्थानाबाहेर हद्दपार करण्यांत आले.

१९३१ साली करवीर व इलाखा कॉंग्रेस कमिटीची स्थापना केली. १९३२ साली अस्पृश्यांसमवेत त्यांनी नृहसिंहवाडी, जगदंबा मंदिरात प्रवेश करण्याचा कार्यक्रम बागलांच्या पुढाकाराने पार पडला. मिश्र विवाहाचा कार्यक्रम त्यांनी हाती घेतला. या काळातच सोनवणे या दलित समाजातील कार्यकर्त्यास नगराध्यक्ष म्हणून निवड करण्यात बागलांचा मोठा वाटा होता.

संस्थानातील शेतकऱ्यांच्या प्रश्नावर लक्ष केंद्रीत करून माधवराव बागलांनी १९३८ साली शेतकऱ्यांचा मोर्चा काढला. त्यावेळी त्यांना अटकही झालेली होती. कोल्हापूर संस्थानातील जनतेच्या राजकीय मागण्या मान्य करून घेण्यासाठी ६ फेब्रुवारी १९३९ अिसवी रोजी संस्थानातील " प्रजा परिषदेची " माधवरावांच्याच अध्यक्षतेखाली स्थापना करण्यांत आली. यानंतर बागलांना अटक होवून सक्तमजूरीची शिक्षा व दोन हजार रूपये दंड झाला. पन्हाळगडावर आठ महिने स्थानबध्दतेत ठेवण्यात आले. भोर (१९४१)

.....

व मिरज (१९४२) संस्थान परिषदांचे माधवराव अध्यक्ष होते. १९४२ साली सांगली मंत्रीमंडळाची त्यांनी निवड केली. सावंतवाडी, जत व अक्कलकोट येथील परिषदांचे बागल अध्यक्ष होते.

प्रजा परिषदेच्या नागरी स्वातंत्र्याच्या मागणीला यश प्राप्त होवून १९४३ साली झालेल्या नगरपालिका निवडणूकीत त्यांना यश प्राप्त झाले. राष्ट्र सेवादलाची कोल्हापूरात त्यांनी स्थापना केली. नंतर चळवळीला यश प्राप्त झाल्यानंतर संस्थानच्या मंत्रीमंडळाचे नेते म्हणून बागलांची निवड झाली. पण त्यांनी समाजवादाचा प्रचार करण्याच्या कार्यासाठी म्हणून मुख्यमंत्री पदाचा त्याग केला.

प्रजा परिषदेची चळवळ सुरु असतानाच माधवराव बागलांनी मजूर चळवळीचे कार्य मोठया जोमाने सुरु केले. १९४१ साली शाहु छत्रपती मिलच्या मजूर संघाची स्थापना केली. सिनेमा थिअटर कामगार, शिंपी, औषधी दुकानातील नोकर, प्रेस कामगार, व्यापारी नोकर, शाहुपूरी हमाल, राष्ट्रीय विडी कामगार, तांत्रिक कामगार, म्युनिसिपल कामगार, मेडिकल स्टाफ आदी कामगार संघटना स्थापन केल्या. त्यानंतर या संस्थांचे " राष्ट्रीय कामगार संघ " २६ मार्च १९४६ रोजी या नांवाखाली एकीकरण करण्यांत आले. संस्थानाबाहेर त्यांनी उगार शुगर मिल, मिरज विडी कामगार, माधवनगर गिरणी मजूर संघ या संघटनांची स्थापना केली. महाराष्ट्र इंटक संघाची सोलापूरला स्थापना करण्यांत त्यांचा मोठा वाटा होता.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर व संस्थान भारतीय संघ राज्यात विलीन झाल्यानंतर माधवराव बागलांनी प्रजा परिषदेचे फेब्रुवारी १९४९ मध्ये "शेतकरी कामगार" पक्षात विलीनीकरण केले. कॉंग्रेस पक्षावर भांडवलदार व बडया जमिनदारांचे वर्चस्व असल्यामुळे डावा विचार मानणाऱ्या शेतकरी कामगार पक्षात जाण्याचा निर्णय घेतला अशी भूमिका बागलांची प्रवेशामागे होती.

.....

शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केल्यानंतर १९५२ चे सार्वत्रिक निवडणूकीत माधवराव बागलांनी उमेदवारी नाकारून पक्षाच्या उमेदवारांचा प्रचार करण्याची जबाबदारी स्विकारली.

१९५१ साली अमरावती येथे पार पडलेल्या संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे बागल अध्यक्ष होते. बेळगांव संयुक्त महाराष्ट्र एकीकरण समितीचे व कोल्हापूर जिल्हा संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे भाई बागल अध्यक्ष होते. मुंबई येथे २९ सप्टेंबर १९५६ रोजी झालेल्या व्दीभाषिक राज्य विरोधी परिषदेचे ते उद्घाटक होते. प्रतापगडावर नेहरूंच्या आगमनाप्रसंगी काढण्यात आलेल्या मोर्चाचा निर्णय बागलांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतच घेण्यात आला होता. सीमा लढयातील पहिले सत्याग्रही म्हणून त्यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रह करण्यांत आला. १ नोव्हेंबर १९५८ रोजी त्यांना अटक होवून चार महिने त्यांनी मंगळूर कारागृहात शिक्षा भोगली. या लढयातील प्रमुख नेते म्हणूनच त्यांची प्रतिमा निर्माण झालेली होती. १९५७ च्या सार्वत्रिक निवडणूकीत संयुक्त महाराष्ट्र समितीच्या उमेदवारांचे प्रमुख प्रचारक म्हणून भाई बागलांनी जबाबदारी स्विकारली. या निवडणूकीत महाराष्ट्रात काँग्रेसला दारूण पराभव स्विकारावा लागला होता.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर काँग्रेसचे नेतृत्व यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब देसाई आदी बहुजन समाजातील नेत्यांच्या हाती आल्यानंतर बागलांनी अपक्ष राहून काँग्रेसला सहकार्य केले. समाजवादावर दृढ निष्ठा असल्यामुळे व नेहरूंनी समाजवादी धोरण स्विकारल्यामुळे त्यांनी काँग्रेसचे प्रचारक म्हणूनच काम केले. सत्तेच्या राजकारणापासून सातत्याने दूर राहण्याचे धोरण त्यांनी शेवटपर्यन्त अंमलात आणले.

.....

भाई माधवराव बागलांनी आपल्यातील प्रतिभावंत कलावंत सातत्याने जीवंत ठेवला. त्यांनी आपल्या कलाकृती व साहित्य ताराराणी विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ, शासकीय आर्ट गॅलरी, बावडा आर्ट गॅलरी या संस्थांना देणगी स्वरूपात दिल्या.

भाई बागलांची कला, नेतृत्व या क्षेत्रात जशी पकड आहे तशीच वैचारिक व वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून लिखान करणारा पुरोगामी सत्यशोधकी विचारवंत म्हणूनही ओळख होते. सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक विषयावरील सखोल चिंतन करून त्यांनी ग्रंथातून व वृत्तपत्रातून लिखान केलेले आहे. " नव्या पिढीचे राजकारण", "बेकारी व तिवर उपाय", "समाज सत्ता की भांडवलशाही", मार्क्सवाद, समाजवाद, लेनिन-स्टॅलिन मानवी संहार बंद करा, सुलभ समाजवाद १ व २ ,संस्थानिक, संस्थानिक प्रजा व फेडरेशन, स्वराज्याचा शत्रू, लग्नबंधन की तुरुंगवास, घोडयावरचा प्रचारक, गोळवळकरी राज्य आले तर, दत्ताबाळ व त्याचे टोळके, कोल्हापूर दर्शन व शाहू महाराज, मानवतावादाचा स्वीकार करा, लोकशाही समाजवाद व निधर्मी राज्य, बुध्दम् शरणम् गच्छामी, कला आणि कलावंत १ व २, कला विहार, कोल्हापूरचे कलावंत, जिव्हाळा, संसार जुलूम संस्थानी राजवट आदी वाङ्मयरूपाने प्रकाशित झालेले आहे.

बंधनात,मी व प्रजा परिषद, जीवन प्रवाह भाग १,२ व ३, सत्याग्रहातून सहकार्यीकडे, जीवन संग्राम, माझा विचार प्रवाह, पडसाद, संघर्ष व सन्मान, माझी सहधर्मचारिणी, सहवासातून, माझा परिवार १ व २, बहुजन समाजाचे शिल्पकार, आजही महात्मा फुले मार्गदर्शक,शाहू महाराजांच्या आठवणी, माझे यशवंतराव, एम. बी. लोहिया व प्रभाकर पंत कोरगांवकर आदी आत्मचरित्रपर ग्रंथांचे लिखान भाई बागलांनी केले आहे.

.....

या ग्रंथांच्या व्यतिरिक्त सत्यशोधक समाजहीरक महोत्सवी ग्रंथ, खंडेराव बागलांचे निवडक लेख, शिव-शाहू, फुले-आंबेडकर व विठ्ठल रामजी शिंदे व भाऊराव आमचे मार्गदर्शक या विचारमंथन करणाऱ्या ग्रंथांचे संपादन भाई बागलांनी केले आहे.

हंटर, आघाडी, धडाडी, अखंड भारत या वृत्तपत्रांच्या संपादनाची जबाबदारी स्विकारुन वैचारिक मांडणी व जनतेच्या रास्त प्रश्नांवर जनमत संघटित करण्यासाठी शोषित समाजाच्या बाजून निर्भिडपणे लिखान करण्याचे कार्य भाई माधवराव बागलांनी या काळात केलेले आहे. पत्रकारीतेत आपले स्वतंत्र व्यक्तीमत्व त्यांनी उभे केलेले दिसते.

भाई बागलांच्या सामाजिक, राजकिय चळवळीतील कार्याची व वैचारिक लिखानाची पोचपावती म्हणून त्यांना अनेक संस्थानी पदव्या देवून गौरव केला आहे. महाराष्ट्र राज्य शासनाने दलित मित्र किताब दिला तर राष्ट्रपतीनी पद्मभूषण किताब देवून गौरव केला. शिवाजी विद्यापीठ, महात्मा फुले विद्यापीठ, मराठवाडा विद्यापीठ यांनी डी. लिट पदवी देवून भाईंचा गौरव केला. इंदिरा गांधीनी ताम्रपट देवून गौरव केला. शाहू पुरस्कार, राज्य संस्कृती मंडळाची फेलोशिपही त्यांना मिळाली. इतर असंख्य संस्था व व्यक्तींनी त्यांच्या कार्याचा गौरव केलेला आहे.

भाई माधवराव बागलांनी आपल्या विचारात व कृतीत विसंगती निर्माण होवू दिली नाही. मुल्यांसाठी सातत्याने झगडत राहण्याची त्यांची वृत्ती कायम होती. वृध्दापकाळात त्यांनी मुल्यांच्या जपवणूकीसाठीच स्वत:चे घर सोडून बाहेर पडले ते शेवटच्या क्षणापर्यन्त त्यांनी तडजोड स्विकारली नाही.

.....

भाई बागलांचे ५ मार्च १९८६ रोजी अल्पशा आजाराने वयाच्या ९० व्या वर्षी निधन झाले. निधनानंतर देखील आपला अंतविधी कोणताही धार्मिक विधी न करता करावा अशी इच्छा त्यांनी लेखी लिहून ठेवलेली होती. वैचारिक निष्ठा कायम ठेवण्याची त्यांची वृत्ती या घटनेवरुन स्पष्ट दिसून येते.[८]

भाई माधवराव बागल यांचे नेतृत्व कलाकारातून वैचारिक निष्ठा बाळगणारा स्पष्टोक्ती असलेला नेता म्हणूनच ओळखले जाते. कलावंताचा जीवंतपणा व चंचलपणा त्यांच्या लिखानातून आपल्याला वारंवार जाणवतो. सत्यशोधक चळवळीच्या वारस्यातून आलेले त्यांचे नेतृत्व सातत्यांने समाजातील शोषित जनतेच्या प्रश्नासाठी संघर्ष करण्यांत पुढाकार घेत असे.

भाई बागलांच्या विचारावर मार्क्सवाद, गांधीवाद, फुले, आंबेडकर, शाहू यांच्या विचारांचा प्रभाव पडलेला दिसतो. भाई बागलांचे नेतृत्व ज्या संघर्षातून पुढे आले त्या चळवळीचा अभ्यास करणे गरजेचे वाटते. म्हणून प्रजा परिषद, कामगारांची चळवळ, सत्यशोधक चळवळ, शेतकरी कामगार पक्ष, संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन या संदर्भात सखोल अभ्यास केला तरच त्यांच्या नेतृत्वाच्या सर्वांगिण बाजूचा विचार करता येतो. भाई बागलांच्या नेतृत्वाचा विकास या चळवळींच्या मधूनच झालेला असल्यामुळे त्याचा अभ्यास या शोध निबंधात सविस्तरपणे करण्यांत आलेला आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात संस्थानिक राजवटीच्या विरोधात व स्वातंत्र्योत्तर कांही काळ कॉंग्रेस राजवटी विरोधात दिलेल्या लढयांचा अभ्यास भाई बागलांचे नेतृत्व समजून घेण्यासाठी करणे गरजेचे आहे. त्यातूनच या नेतृत्वाचे सर्व पैलू समजू शकतील.

.....

# संदर्भ सूची

## प्रकरण पहिले

## ऐतिहासिक पार्श्वभूमि


१. पटवर्धन वि. अ. (संपा.) संस्थानातील लोकशाही लढा, संस्थानी स्वराज्य कचेरी, प्रकाशन पुणे-१९४०

२. हेरवाडे श्रीधर, छत्रपती राजाराम महाराज चरित्र ग्रंथ छत्रपती राजाराम प्रतिष्ठान, कोल्हापूर १९८३ पान १४ ते १५

३. उक्त " १७ ते ११८

४. जनगणना अहवाल १९३१ भाग २ " १३७ - १३८

५. माधवराव बागल, बहुजन समाजाचे शिल्पकार राजारामपुरी, कोल्हापूर " ३२

६. अ) हेरवाडे श्रीधर उपरोल्लिखित " २१ ते २४
ब) कीर धनंजय - राजर्षी शाहू छत्रपती पाप्युलर प्रकाशन मुंबई १९७९ " ८६ ते १०२

७. पटवर्धन वि. अ. उपरोल्लिखित

८. अ) बागल माधवराव "सत्याग्रहातून सहकार्याकडे" राजारामपूरी, कोल्हापूर
ब) दै. लोकसत्ता मुंबई दिनांक ७ मार्च १९८६
क) दै. केसरी सोलापूर दिनांक ७ मार्च १९८६
ड) दै. पुढारी कोल्हापूर दिनांक ५ एप्रिल १९८६


=Ø=Ø=Ø=Ø=Ø=Ø=Ø=